जनसंपर्क कक्ष

30 DEC 2025 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नागरिकांनी ग्राहक संरक्षण कायद्याचे ज्ञान आत्मसात करणे आवश्यक

## प्रा. सुप्रिया मोगले; संरक्षणाबाबत विद्यापीठात विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

प्रत्येक नागरिकाने ग्राहक संरक्षण कायद्याचे ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन दूर शिक्षण केंद्राच्या एम.बी.ए.च्या सहायक प्रा. सुप्रिया मोगले यांनी व्यक्त केले.




विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वाणिज्य विभागांतर्गत 'ग्राहक संरक्षण कायदा : हक्क, जबाबदाऱ्या आणि जागरूकता' या विषयावर आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संचालक डॉ. कृष्णा पाटील होते. याप्रसंगी उपकुलसचिव विनय शिंदे, सहा. कुलसचिव दिलीप मोहाडीकर, समन्वयक डॉ. चांगदेव बंडगर उपस्थित होते. मोगले म्हणाल्या, नागरिकांनी ग्राहक संरक्षण कायद्याची पार्श्वभूमी समजावून घेतली पाहिजे. अध्यक्षीय भाषणात डॉ. कृष्णा पाटील म्हणाले, ग्राहक संरक्षण कायदा हा विद्यार्थ्यांसाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. डॉ. सुशांत माने यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सचिन देठे यांनी सूत्रसंचालन केले. संतोष देवेकर यांनी आभार मानले.

30 DEC 2025
लोकमत

# 'ऑनलाइन खरेदीत दक्षता महत्त्वाची'

**कोल्हापूर :** प्रत्येक नागरिकाने ग्राहक संरक्षण कायद्याचे ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे, विशेषत: ऑनलाइन खरेदीदरम्यान अधिक दक्षता घेतली पाहिजे, असे आवाहन दूर शिक्षण केंद्राच्या एम.बी.ए.च्या सहायक प्राध्यापक सुप्रिया मोगले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या वाणिज्य विभागांतर्गत "ग्राहक संरक्षण कायदा : हक्क, जबाबदाऱ्या आणि जागरूकता" या विषयावरील विशेष ऑनलाइन व्याख्यानात त्या बोलत होत्या. संचालक डॉ. कृष्णा पाटील अध्यक्षस्थानी होते. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर, समन्वयक डॉ. चांगदेव बंडगर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

30 DEC 2025
पुण्यनगरी

# स्वयंअध्ययन साहित्याबाबत उद्या विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने पीएम उषा योजनेंतर्गत विविध अभ्यासक्रमांचे अभ्यास मंडळ चेअरमन व घटक लेखक असणारे शिक्षक यांच्यामध्ये स्वयंअध्ययन साहित्य लेखनाच्या दृष्टीने अधिकची प्रगल्भता शैक्षणिक गुणवत्तापूर्ण व प्रभावी करण्याच्या अनुषंगाने नवीन शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी 'स्वयंअध्ययन साहित्य विकास आणि संपादन' या विषयावर एकदिवसीय



कार्यशाळेचे मंगळवार, दि. ३० रोजी सकाळी १० वाजता दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र येथे आयोजन करण्यात आल्याची माहिती संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली.

कार्यशाळेचे उद्घाटन केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या विद्यापीठ अनुदान आयोगाचे सहा. सचिव डॉ. मधुकर वावरे यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव असतील. माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर व कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यशाळा चार सत्रांत होणार असून, पहिल्या सत्रामध्ये 'स्वयंअध्ययन साहित्य आणि संहिता लेखन' याविषयी डॉ. हिर्डेकर मार्गदर्शन करतील. दुसऱ्या सत्रामध्ये 'कृती आधारित स्वयंअध्ययन साहित्याचे विकसन आणि त्यातील आयसीटीचा वापर' याविषयी डॉ. नीलिमा सप्रे मार्गदर्शन करतील. तिसऱ्या सत्रामध्ये 'भाषाशैली आणि भाषा रचना' याविषयी डॉ. अनिल गवळी आणि चौथ्या सत्रामध्ये 'स्वयंअध्ययन साहित्य आणि संपादन' याविषयी डॉ. संजीवनी महाले मार्गदर्शन करतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

30 DEC 2025
पुढारी

# स्वयंअध्ययन साहित्याबाबत आज विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने पी. एम. उषा योजने अंतर्गत नवीन शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी 'स्वयंअध्ययन साहित्य विकास आणि संपादन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे मंगळवारी (दि. ३०) सकाळी १० वाजता दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र येथे आयोजन करण्यात आल्याची माहिती संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली.

विविध अभ्यासक्रमांचे अभ्यासमंडळ चेअरमन व घटक लेखक असणारे शिक्षक यांच्यामध्ये स्वयंअध्ययन साहित्य लेखनाच्या दृष्टीने अधिकची प्रगल्भता, शैक्षणिक गुणवत्ता पूर्ण व प्रभावी करण्याच्या अनुषंगाने ही कार्यशाळा होत आहे. कार्यशाळेचे उद्घाटन केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या विद्यापीठ अनुदान आयोगाचे सहा.सचिव डॉ. मधुकर वावरे यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव असतील. माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यशाळा चार सत्रांत होणार असून, पहिल्या सत्रामध्ये 'स्वयंअध्ययन साहित्य आणि संहिता लेखन' याविषयी डॉ. हिर्डेकर मार्गदर्शन करतील. दुसऱ्या सत्रामध्ये 'कृती आधारित स्वयंअध्ययन साहित्याचे विकसन आणि त्यातील आयसीटीचा वापर' याविषयी डॉ. नीलिमा सप्रे मार्गदर्शन करतील. तिसऱ्या सत्रामध्ये 'भाषाशैली व भाषा रचना' याविषयी डॉ. अनिल गवळी आणि चौथ्या सत्रामध्ये 'स्वयंअध्ययन साहित्य आणि संपादन' याविषयी डॉ. संजीवनी महाले मार्गदर्शन करणार आहेत.

30 DEC 2025
पुढारी

# विचार प्रक्रियेत कौशल्यांच्या कक्षा वाढविण्याची गरज : डॉ. शितोळे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

उच्च शिक्षणातील आंतरराष्ट्रीयकरण करण्यासाठी विचार प्रक्रियेमध्ये जुन्या-नव्या कौशल्यांच्या कक्षा वाढविण्याची गरज असल्याचे मत महावीर महाविद्यालयातील प्रा. डॉ.शिरीष शितोळे यांनी केले.

प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (पीएम.उषा ) शिवाजी विद्यापीठ शिक्षणशास्त्र अधिविभाग येथे शिक्षक व प्राध्यापकांसाठी अनुभवाधारित अध्यापनशास्त्र या विषयावर नुकतीच दोन दिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना प्र. सोनकांबळे यांनी आजच्या जागतिकीकरणाच्या काळामध्ये अनुभवाधारित अध्यापनशास्त्र शिक्षक विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक व उपयुक्त असल्याचे सांगितले. कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. रूपाली संकपाळ यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अंजली गायकवाड यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

सूत्रसंचालन बी.एड., एम.एड. प्रशिक्षणार्थी पूजा कांडपाल यांनी केले. कादंबरी खांडेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. सुप्रिया पाटील, सरस्वती कांबळे, सारिका पाटील, डॉ. विजय सदामते यांच्यासह संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

3 0 DEC 2025

पुण्यनगरी

# कौशल्यांच्या कक्षा वाढवण्याची गरज : डॉ. शिरीष शितोळे

कोल्हापूर : प्रतिनिधी

प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (पीएम उषा) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर शिक्षणशास्त्र अधिविभाग येथे शिक्षक व प्राध्यापकांसाठी 'अनुभवाधारित अध्यापनशास्त्र' या विषयावर दि. २९ व ३० डिसेंबर रोजी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. प्रस्तुत कार्यशाळेसाठी प्रमुख उपस्थिती व कार्यशाळेचे व्याख्याते महावीर महाविद्यालय येथील डॉ. शिरीष शितोळे यांनी 'उच्च शिक्षणातील आंतरराष्ट्रीयकरण करण्यासाठी विचार प्रक्रियेमध्ये जुन्या-नव्या कौशल्यांच्या कक्षा वाढवण्याची गरज' असल्याचे महत्त्व विशद केले.

शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी 'आजच्या जागतिकीकरणाच्या काळामध्ये अनुभवाधारित अध्यापनशास्त्र शिक्षक विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक व उपयुक्त' असल्याचे सांगितले. प्रस्तुत कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. रूपाली संकपाळ यांनी प्रास्ताविक केले व कार्यशाळेचा हेतू विशद केला.

डॉ. अंजली गायकवाड यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन बी. एड., एम.एड. प्रशिक्षणार्थी पूजा कांडपाल यांनी केले. आभार कादंबरी खांडेकर यांनी मानले. कार्यशाळेसाठी डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. सुप्रिया पाटील, सरस्वती कांबळे, सारिका पाटील व डॉ. विजय सदामते व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

30 DEC 2025

सकाळ

# स्वयंअध्ययन साहित्याबाबत आज कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे स्वयंअध्ययन साहित्य लेखनाबाबत मंगळवारी (ता. ३०) सकाळी दहा वाजता कार्यशाळा होणार आहे. दूरशिक्षण केंद्रातील या कार्यशाळेचे उद्‌घाटन केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या विद्यापीठ अनुदान आयोगाचे सहायक सचिव डॉ. मधुकर वावरे यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर होणाऱ्या सत्रांमध्ये डॉ. बी. एम. हिर्डेकर, नीलिमा सप्रे, अनिल गवळी, संजीवनी महाले मार्गदर्शन करणार असल्याची माहिती दूरशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली.

30 DEC 2025

सकाळ

# ग्राहक संरक्षण कायद्याचे ज्ञान आत्मसात करा : मोगले

कोल्हापूर : 'प्रत्येक नागरिकाने ग्राहक संरक्षण कायद्याचे ज्ञान आत्मसात करावे,' असे प्रतिपादन दूरशिक्षण केंद्राच्या 'एम.बी.ए.'च्या सहायक प्रा. सुप्रिया मोगले यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वाणिज्य विभागांतर्गत 'ग्राहक संरक्षण कायदा : हक्क,जबाबदाऱ्या आणि जागरुकता' यावर विशेष ऑनलाईन व्याख्यानात त्या बोलत होत्या. संचालक डॉ. कृष्णा पाटील अध्यक्षस्थानी होते. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर, डॉ. चांगदेव बंडगर उपस्थित होते. प्रा. मोगले म्हणाल्या, 'ग्राहकांचे मूलभूत हक्क, जबाबदारी, तक्रार निवारण यंत्रणा तसेच ऑनलाईन खरेदीदरम्यान घ्यावयाची दक्षता याविषयी माहिती असावी.' डॉ. पाटील म्हणाले, 'ग्राहक संरक्षण कायदा हा विद्यार्थ्यांसाठी तसेच नागरिकांसाठी उपयुक्त आहे.' डॉ. सुशांत माने यांनी स्वागत केले. डॉ. सचिन देठे यांनी सूत्रसंचालन केले. संतोष देवेकर यांनी आभार मानले.

30 DEC 2025

सकाळ

# ग्राहक संरक्षण कायद्याचे ज्ञान आत्मसात करा : मोगले

कोल्हापूर : 'प्रत्येक नागरिकाने ग्राहक संरक्षण कायद्याचे ज्ञान आत्मसात करावे,' असे प्रतिपादन दूरशिक्षण केंद्राच्या 'एम.बी.ए.'च्या सहायक प्रा. सुप्रिया मोगले यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वाणिज्य विभागांतर्गत 'ग्राहक संरक्षण कायदा : हक्क, जबाबदाऱ्या आणि जागरुकता' यावर विशेष ऑनलाईन व्याख्यानात त्या बोलत होत्या. संचालक डॉ. कृष्णा पाटील अध्यक्षस्थानी होते. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर, डॉ. चांगदेव बंडगर उपस्थित होते. प्रा. मोगले म्हणाल्या, 'ग्राहकांचे मूलभूत हक्क, जबाबदारी, तक्रार निवारण यंत्रणा तसेच ऑनलाईन खरेदीदरम्यान घ्यावयाची दक्षता याविषयी माहिती असावी.' डॉ. पाटील म्हणाले, 'ग्राहक संरक्षण कायदा हा विद्यार्थ्यांसाठी तसेच नागरिकांसाठी उपयुक्त आहे.' डॉ. सुशांत माने यांनी स्वागत केले. डॉ. सचिन देठे यांनी सूत्रसंचालन केले. संतोष देवेकर यांनी आभार मानले.

2 9 DEC 2025

जनप्रवास

# कायद्याचे ज्ञान आत्मसात करावे : प्रा. सुप्रिया मोगले

कोल्हापूर : प्रत्येक नागरिकाने ग्राहक संरक्षण कायद्याचे ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे, असे मत दूरशिक्षण केंद्राच्या प्रा. सुप्रिया मोगले यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वाणिज्य विभागांतर्गत "ग्राहक संरक्षण कायदा : हक्क,जबाबदाऱ्या आणि जागरूकता" या विषयावर आयोजित ऑनलाईन व्याख्यानात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संचालक डॉ. कृष्णा पाटील होते. त्या म्हणाल्या,नागरिकांनी ग्राहकांचे मूलभूत हक्क, जबाबदारी, तक्रार निवारण यंत्रणा तसेच ऑनलाईन खरेदीदरम्यान घ्यावयाची दक्षता याविषयी घेणे आवश्यक आहे. डॉ. सुशांत माने यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सचिन देठे यांनी सूत्रसंचालन केले. संतोष देवेकर यांनी आभार मानले. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, सहाय्यक कुलसचिव दिलीप मोहाडीकर, डॉ. चांगदेव बंडगर उपस्थित होते.

3 0 DEC 2025

लोकमत

# विद्यापीठात प्राध्यापकांच्या कार्यशाळेला प्रतिसाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागात शिक्षक आणि प्राध्यापकांसाठी 'अनुभवाधारित अध्यापनशास्त्र' या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेला प्रतिसाद लाभला. महावीर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. शिरीष शितोळे यांनी, उच्च शिक्षणातील आंतरराष्ट्रीयीकरण करण्यासाठी विचार प्रक्रियेमध्ये जुन्या-नव्या कौशल्यांच्या कक्षा वाढविण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले. विभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे, समन्वयक डॉ. रूपाली संकपाळ यांनी या कार्यशाळेचा हेतू सांगितला. डॉ. अंजली गायकवाड यांनी परिचय करून दिला. बी.एड., एम.एड प्रशिक्षणार्थी पूजा कांडपाल यांनी सूत्रसंचालन केले. कादंबरी खांडेकर यांनी आभार मानले.

30 DEC 2025
लोकमत

# पाच जिल्ह्यांतील स्पर्धकांचे शोधनिबंध सादर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभाग आणि पुणे येथील राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या विभागस्तरीय शोधनिबंध स्पर्धेत पाच जिल्ह्यांतील स्पर्धकांनी विविध विषयांवर आपले शोधनिबंध सादर केले.

शिक्षणशास्त्र विभाग आणि विभागातील शैक्षणिक व प्रशिक्षण संस्थेच्या सामंजस्य कराराअंतर्गत शिक्षक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी विभागात ही शोधनिबंध स्पर्धा पार पडली. स्पर्धेसाठी शिक्षणशास्त्र विभागातील डॉ. विद्यानंद खंडागळे आणि प्राचार्य डॉ. राजेंद्र भोई यांनी मार्गदर्शन केले. परीक्षक म्हणून डॉ. राजेंद्र भोई, डॉ. लता पाटील आणि प्राची जगताप यांनी काम पाहिले.

30 DEC 2025
सकाळ

# शिक्षणशास्त्र अधिविभागात शोधनिबंध स्पर्धा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभाग आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणेतर्फे शिक्षक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकरीता विभागस्तरीय शोधनिबंध स्पर्धेचे आयोजन केले. शिक्षणशास्त्र अधिविभाग, विभागातील शैक्षणिक व प्रशिक्षण संस्था यांच्या सामंजस्य करारांतर्गत स्पर्धेचे आयोजन केले होते. शिक्षणशास्त्र विभागातील डॉ. विद्यानंद खंडागळे, प्राचार्य डॉ. राजेंद्र भोई यांचे मार्गदर्शन लाभले. परीक्षक म्हणून डॉ. राजेंद्र भोई, डॉ. लता पाटील, प्राची जगताप यांनी काम पाहिले. यामध्ये पाच जिल्ह्यामधील स्पर्धकांनी विविध विषयांवर शोधनिबंध सादर केले. यावेळी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. रूपाली संकपाळ उपस्थित होते.

30 DEC 2025
सकाळ

# छत्रपती शिवाजी विद्यानिकेतनच्या खेळाडूंची कुराश स्पर्धेसाठी निवड

सकाळ वृत्तसेवा

पेठवडगाव, ता. २९ : येथील छत्रपती शिवाजी विद्यानिकेतन ज्युनिअर कॉलेज व दिशा इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय कुराश स्पर्धेसाठी निवड झाली. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे यांच्या वतीने इंदापूर येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय कुराश स्पर्धेत विद्यार्थ्यांनी यश मिळवले.

यशस्वी विद्यार्थी असे : १९ वर्षे वयोगट - अनुक्रमे जय घाडगे, मुद्दिर शेख, स्मित पाटील. १७ वर्षे वयोगट - ऋतुराज भांडवलकर (तृतीय). प्रथम व द्वितीय क्रमांकप्राप्त विद्यार्थ्यांची बिहार येथे होणाऱ्या असोसिएशन राष्ट्रीय ज्युनिअर कुराश स्पर्धेसाठी राज्य संघामध्ये निवड झाली. स्पर्धेत पृथ्वीराज पाटील, कमलाकर वाघमोडे, श्रेयश कांबळे यांनी भाग घेतला.

विद्यार्थ्यांना शाळेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र माने, सचिव सुवर्णा माने, बापूसाहेब माने यांचे प्रोत्साहन, क्रीडा प्रशिक्षक अक्षय पाटील, जिमखानाप्रमुख आनंद पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



पेठवडगाव : येथील छत्रपती शिवाजी विद्यानिकेतन व ज्युनिअर कॉलेजच्या खेळाडूंची राष्ट्रीय कुराश स्पर्धेसाठी निवड झाली. खेळाडूंसोबत राजेंद्र माने, राजेंद्र पाटील, आनंद पाटील, अक्षय पाटील.

30 DEC 2025 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# शिक्षण : काल, आज आणि उद्या



डॉ. व्ही. एन. शिंदे,
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
ई-मेल : vilasshindevs44@gmail.com


**शिक्षण म्हणजे माणूस परिपूर्ण होण्यासाठी, माणसाला माणूसपण येण्यासाठी एक उपयुक्त साधन आहे. ज्ञान, कौशल्ये, मूल्ये आणि समाजामध्ये एक सुज्ञ नागरिक म्हणून आवश्यक असणाऱ्या सवयी देण्याची शिक्षण ही एक प्रक्रिया आहे. शिक्षणामुळे व्यक्तीच्या विचार आणि कार्य करण्याच्या क्षमतेवर सकारात्मक परिणाम होतो. व्यक्तीला स्वत:चे हक्क समजतात कर्तव्याचीही जाणीव होते.**



आज शिक्षण हे शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठातून व दैनंदिन जीवनातील अनुभवाद्वारे मिळत असते. यातून स्वत:चा व राष्ट्राचाही आर्थिक विकास साधण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि ज्ञान शिक्षणातून प्राप्त होत असते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे यातून जबाबदार नागरिक घडण्याची प्रक्रिया पूर्ण होत असते. जसजसा काळ बदलत गेला तस तसे शिक्षणही नवे रूप धारण करत आहे. वाढत्या आधुनिकतेनुसार शिक्षणातही अमुलाग्र बदल होत असुन येणाऱ्या २० वर्षात शिक्षण अनेक विकासाचे टप्पे पुर्ण करेल यात शंका नाही.

पूर्वीच्या काळी शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर देण्यात येत असे. विद्यार्थी कोणीही असो, त्याचा कल कोणत्या शिक्षणाकडे आहे हे तपासून त्याला त्या विषयाचे शिक्षण दिले जात असे. जीवक हे अनाथ असूनही जगविख्यात वैद्य झाले, ते यामुळेच. जैन पाठशाला सर्व भारतभर स्थापन झाल्या. जैन शिक्षण पद्धतीमध्ये अंकांची प्रथम ओळख करून देण्यात येत असे. त्यानंतर अक्षरांची दोस्ती करायला शिकवले जाई. पुढे गुरूकुल पद्धती आली आणि रूजलीही. यामध्ये विद्यार्थी गुरूगृही राहून शिक्षण घेत असे. या व्यवस्थेमध्ये गुरूगृही पडतील ती सर्व कामेही करावी लागत असे. यातून विद्यार्थ्याला शिक्षणाबरोबर श्रमाचीही सवय होत असे.

यामध्ये अनेक बदल झाले तरी, विद्यार्थ्यांची कलचाचणी सुरूच होती. पुढच्या टप्प्यावर नालंदा आणि तक्षशिला या दोन प्रख्यात संस्था ज्यांना विद्यापीठ म्हणून जगन्मान्यता लाभली होती, त्या विकसित झाल्या. तेथे हजारो विदेशी विद्यार्थी अध्ययनासाठी येत असत. तेथील प्रचंड ग्रंथसंपदा जाळण्यात आली. येथील शिक्षण व्यवस्थेवर तो मोठा आघात होता. त्यातूनही गुरूकुल शिक्षण पद्धती टिकून होती. पुढे इंग्रजांनी भारतावर सर्वंकश सत्ता मिळवल्यानंतर आधुनिक शिक्षण पद्धती



अस्तित्वात येऊ लागली. त्यातही अनेक बदल होत गेले. महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रिबाई फुले यांनी अथक परिश्रम आणि त्रास सहन करून समाजातील सर्व स्त्रोत, घटकांपर्यंत शिक्षणाची गंगा नेली. इंग्रजांनी शिक्षण पद्धती दिली तरी शिक्षणाची गंगा सर्वधर्मियांच्या दारापर्यंत नेण्यासाठी या दांपत्याने योगदान दिले नसते तर ती पुढे अनेक वर्षे सर्व घटकांच्या दारापर्यंत पोहोचू शकली नसती. ब्रिटीश काळांपासून शाळा ही संकल्पना अस्तित्वात आली. मुले घरीच राहून शाळेत जाऊ लागली. पुढे माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालये सुरू झाली. १८५७ साली संलग्नित विद्यापीठाची स्थापना झाली. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे ही संरचना उभा राहिली. तीच आजही अस्तित्वात आहे.

१९८४ पर्यंत महाराष्ट्रात तरी शिक्षण देण्याची संपूर्ण जबाबदारी शासनाच्या खांद्यावर होती. १९८४ मध्ये महाराष्ट्रात खाजगी संस्थांना शुल्क आकारून विनाअनुदानीत पद्धतीने महाविद्यालये स्थापन करण्यासाठी परवानगी दिली जाऊ लागली. त्यातून आजची शिक्षण व्यवस्था उभा राहिली. काही आदिवासी आणि दलित कुटुंबे वगळता, प्रत्येक कुटुंबातील आज किमान दुसरी पिढी शिक्षणाची फळे चाखत असल्याचे आपणास आढळून येते.

त्यानंतर २०१९ मध्ये नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा मसुदा प्रसिद्ध करण्यात आला. मात्र याकडे फारसे गांभिर्याने पाहिले गेले नाही. त्यावर जेवढे विचारमंथन होणे गरजेचे होते, तितके झाले नाही. याचा परिणाम, धोरण राबवताना अनेक संस्था आणि शासनास अनेक अडथळे येतात. त्यामुळे वारंवार यामध्ये बदल करावे लागत आहेत. वास्तविक पाहता हे धोरण प्रसिद्ध झाल्यानंतर सर्व प्रसारमाध्यमातून अनेक पैलू आणि तरतुदीबाबत सविस्त्र चर्चा होऊन अंमलबजावणी कशी करावी लागेल, याचा आराखडा तयार होण्याची गरज होती. मात्र हे धोरण आल्यानंतर प्रशासनाने त्यावर आलेल्या मोजक्या सूचनांची दखल घेत हे धोरण २०२० मध्ये लागू केले.

खरे तर हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे अतिशय चांगल्या हेतूने तयार करण्यात आले आहे. त्यामध्ये अपेक्षित उद्दिष्टे आणि त्यासाठी सूचवलेले बदल हे चांगले आहेत. विद्यार्थ्यांना कौशल्ये प्राप्त व्हावीत यासाठी प्रात्मक्षिकांवर मोठा भर देण्यात आला आहे. अनुभवातून शिक्षणाचाही समावेश आहे. वास्तविक पाहता, देश स्वतंत्र झाल्यानंतर शैक्षणिक व्यवस्थेमध्ये अंमलबजावणीच्या पातळीवर एवढ्या मोठ्या प्रमाणात बदल प्रथमच होत आहेत. त्यामुळे अपवादात्मक का होईना, या धोरणाची अंमलबजावणी करताना, अडचणी येणे, त्या सोडवण्यासाठी

▶ पान २ वर..

30 DEC 2025
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षण : काल, आज आणि उद्या




पान १ वरुन...

वेळ देणे आणि त्यामुळे गोंधळ उडणे, हे समजून घेण्याची गरज आहे. यापूर्वी प्रत्येक विषयाने स्वत: भोवती एक अदृष्य भिंत उभारली होती. विशेष म्हणजे अनेक शिक्षकच या भिंतीचे रक्षण करत. त्यामुळे एखाद्याने गणिताचा अभ्यास केला असेल आणि पुढे त्याला मानसशास्त्र शिकावे वाटले तर यंत्रणा ते मान्य करत नसे. मात्र या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये आंतरविद्याशाखीय आणि बहुविद्याशाखीय दृष्टीकोन ठेवला आहे. त्यामुळे एखाद्या विज्ञानाच्या विद्यार्थ्याला पुढे आपण पत्रकारिता करावी किंवा विज्ञानप्रसारक व्हावे असे वाटले तर तो विज्ञानाचे शिक्षण घेत असतानाच पत्रकारितेचेही धडे गिरवू शकतो तसेच भाषिक कौशल्ये आत्मसात करत असताना तो अन्य विज्ञानाचा एखादा विषय अभ्यासू शकतो. हे स्वातंत्र्य या शैक्षणिक धोरणाने विद्यार्थ्यांना दिले आहे.

विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये या धोरणाने आणलेले बदल खूपच महत्त्वाचे आहेत. पीएच. डी वगळता अन्य कोणतेही शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यास दोन पदव्या घेण्याची मुभा देण्यात आली आहे. त्याचबरोबर आपले शिक्षण काही काळासाठी खंडीत करून पुन्हा तो अभ्यासक्रम पूर्ण करण्याची तरतूद उपलब्ध करून देण्यात आली आहे.

अगदी दिर्घ अभ्यासक्रम पूर्ण करतानाही विद्यार्थ्यास दूरशिक्षण पद्धतीने दुसरी पदवी घेण्याची परवानगी देण्यात आली आहे. या सुविधेचा लाभ अनेक विद्यार्थी घेत आहेत. हा फार मोठा बदल या नव्या शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे.

यानुसार देशाचा ग्रॉस इन्रोलमेंट रेशो म्हणजेच शिक्षण घेण्याच्या वयामध्ये किती टक्के विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, आज हा रेशो ३५ टक्के असून २०३५ पर्यंत तो ५० टक्केपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी येणारा खर्च, शिक्षक नियुक्ती आणि शिक्षक उपलब्धतेची समस्या, त्यावर होणारा खर्च लक्षात घेता दूर शिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण पद्धतीवर विशेष भर देण्यात आला आहे.

ऑनलाईन एम.बी.ए. हा अभ्यासक्रम अनेक खाजगी विद्यापीठानी सुरू केला. या अभ्यासक्रमास लक्षावधी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. राज्य विद्यापीठांनीही ऑनलाईन अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आज शिवाजी विद्यापीठाने ऑनलाईन एम.बी.ए., एम. एस्सी. गणित आणि एम. कॉम. हे अभ्यासक्रम सुरु केले आहेत. या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रवेशापासून निकालापर्यंत सर्व गोष्टी ऑनलाईन पद्धतीने होतात.

नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आपले शिक्षण सुरू ठेवण्यासाठी ही सुविधा उपयुक्त ठरत आहे. भविष्यात नियमित अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा दूर शिक्षण पद्धती आणि ऑनलाईन शिक्षण पद्धतीला पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त असणार आहे. आणखी गुणवत्ताधारक महाविद्यालयांना प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्यात आला आहे. अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महाविद्यालय आणि विद्यापीठाची संयुक्त पदवी देण्यात येऊ लागली. दरम्यानच्या काळात अभिमत विद्यापीठांची रचना निर्माण करण्यात आली.

▶ पान ३ वर...